**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.मृगेंद्र नंदकुमार शेटे
द्वारा श्री.दिलीप निवृत्ती डोंबे
गुरुकृपा, कृष्णाली वसाहत, चिंतामणराव व्यापार विद्यालयाचे मागे,
विश्रामबाग, सांगली-४१६४१५ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सांगली

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ११ / सांगली / २००६ |
| २.सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत कार्यक्रम) | १४.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, सांगली श्री.वि.ना.परदेशी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सांगली
तत्कालीन-श्री.पी.बी.माने, विद्यमान-श्री.उ.व्यं.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | ३१.१२.२००५ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २५.१.२००६ |
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | ९.३.२००६ |
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २१.४.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे दिघंची येथील सि.स.नं.४४० व ४७७ या मिळकतीबाबत न्यायालयात रिव्हिजन अर्ज प्रलंबित असलेने भूमी अभिलेख कार्यालयाची कार्यवाही तहकूब ठेवणेसाठी दि.५.७.२००५ रोजी अर्ज व ॲफेडेव्हिट सादर केलेले होते, त्यावरील निर्णय दिला असल्यास प्रत. निर्णय पक्षकारांना कळवला का. असल्यास पोस्टाच्या दाखल्याची प्रत व जावक नोंदवहीची प्रत. अर्जावर अद्याप हुकूम केला नसल्यास त्याची माहिती. तसेच या मिळकतीबाबत झालेल्या सर्व आदेशांच्या प्रती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मृगेंद्र नंदकुमार शेटे यांनी आपल्या मिळकतीच्या संदर्भात महसुली न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांनी फेटाळले. त्याविरुध्द श्री.शेटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मौजे दिघंची, तालुका आटपाडी येथील सिटी सर्व्हे क्र.४४० व ४७७ याच्या मिळकत पत्रिकेतील वारस नोंदीच्या संबंधातील हा विषय आहे. अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांनी वारस अर्जाच्या संदर्भातील अपिलावर एकतर्फी निर्णय दिला. त्याबाबतची माहिती आपल्याला मिळाली नाही व तेच अपिलीय प्राधिकारी असल्यामुळे त्यांनी अपील फेटाळले, असे प्रतिपादन श्री.शेटे यांनी लेखी निवेदनात केले आहे. 'अर्जदार श्री.मृगेंद्र नंदकुमार शेटे म्हणून ॲड.श्री.महिंद्र नंदकुमार शेटे हे श्री.मृगेंद्र नंदकुमार शेटे यांची सही करुन माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करतात. कारण अर्जातील हस्ताक्षर व स्वाक्षरीतील हस्ताक्षर हे एकच असल्याचे दिसून येत असल्याने अर्जदार हेच ॲड.श्री.महिंद्र नंदकुमार शेटेच असल्याचे दिसून येते. अर्जदार याना मौजे दिघंची, ता.आटपाडी येथील सि.स.नं.४४० व ४७० बाबत दिघंची येथील लिंगायत समाजाने प्राधिकृत केले नसतानाही वैयक्तिक वादापोटी ते माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करीत असलेचे दिसून येते,' असे अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.एन.परदेशी यांनी अपिलाच्या निर्णयात नमूद केले

आहे. श्री.शेटे विविध नावांनी अर्ज करतात, असे प्रतिपादन त्यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सागली यांनी श्री.शेटे यांना माहिती दिल्याचे जन महिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले.

उभय बाजूंनी सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री.शेटे यांनी मागितलेली माहिती खुलासा अथवा जाब विचारण्याच्या, तसेच आपण केलेल्या भाष्यावर अभिप्राय मागण्याच्या स्वरुपाची आहे . माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार असे करणे योग्य नाही. तसेच अन्य व्यक्तींच्या नावे व त्यांची स्वाक्षरी करुन अर्ज केले जात असल्यास, ती गंभीर बाब असून कारवाईस पात्र आहे, याची समज संबंधितांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.९.२००८

सप्टेंबर-४७-४९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री दीपचंद भिकचंद संचेती — अपीलकर्ता
मु. पो. ता. करमाळा, रत्नदीप वेताळपेठ
जि. सोलापूर

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, कर्जत,
ता. कर्जत, जि. अहमदनगर

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, कर्जत,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०३/सोलापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | १४.०७.२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २.०८.२००८ |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | मौजे चिलवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथील जुना सर्व्हे नंबर १८७ व हल्लीचा गट नंबर ५८३ या शेतजमिनीस ७/१२ ला मालक व पीक पाहणी यावर नमूद केलेली नावे कोणत्या आदेशाने दाखल झाली व हक्काचा प्रकार नंबर ६५० च्या उता-याची प्रत मिळावी. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री दीपचंद भिकचंद संचेती यांनी निवासी नायब तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी, कर्जत यांच्याकडे जुना सर्व्हे नंबर १८७ व नवीन गट नंबर ५८३ सबंधीची माहिती मागितली होती. त्यानंतर आवश्यक ती माहिती न मिळाल्याने अपीलकर्ता श्री संचेती यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २६/०८/२००८ रोजी अपील केले. सदर माहिती दि. ६.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये निःशुल्क मिळाली असल्याने अपील निकाली काढण्याची विनंती श्री. संचेती यांनी दि. ८.०९.२००८ च्या पत्राने आयोगास केली आहे.

वरील विवेचन विचारात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि.१६. १०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १६.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११३४ / पुणे | सौ. वेदवती विनायक भावे रा. ५८७, बुधवार पेठ, पाटीलसदन, पुणे-४११ ००२ | नगर भूमापन अधिकारी क्र.१, शुक्रवार पेठ, पुणे-२ | अधीक्षक भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ | मौजे पाषाण येथील सि.स.नं.१५०५ या मिळकत पत्रिकेवर लीज डीड प्रमाणे नावे लावण्यासाठी दि. १२.४.२००७ रोजीच्या अर्जावर घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |
| २ | ११६८ / पुणे | सौ. सरोज जगदिश लाटे रा. प्लॉट नं.३१, गणेशकृपा, एरंडवणा, पुणे-४ | गाव कामगार तलाठी मौजे कासार-आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे | मंडलाधिकारी पौड, तहसील कार्यालय, मुळशी, ता.मुळशी, जि. पुणे | मौजे कासार-आंबोली ता. मुळशी येथील गट नंबर १९७ या जमिनीवर अ पत्रका प्रमाणे ७/१२ उताऱ्यावर नाव लावणेबाबत | अपीलकर्ता गैरहजर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करून दिल्याचे नमूद केले आहे. मात्र अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०९७ / पुणे | श्री. सुशिलकुमार गोवर्धनदास बाहेती रा. प्लॉट नं.२१८, सेक्टर नं.२४, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ | निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे | तहसीलदार, वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे | मौजे साते, ता.मावळ, येथील गट नंबर १४५-अ व १४५-ब चे संगणीकृत ७/१२ मिळणेबाबत | अपीलकर्ता गैरहजर अपिलीय प्राधिकाऱ्याने दि. १.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिल्याचे कळविले आहे. व जन माहिती अधिकारी यांनी ही निवेदनात नमूद केले आहे. |
| ४ | १०९६ / पुणे | श्री. प्रमोद भिमराव भालेराव द्वारा निर्मला वनशिव रा. २२६, भवानी पेठ, रामोशी गेट, पुणे-४११ ०४२ | निवासी नायब तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | मौजे कोंढवा खुर्द ता. हवेली येथील स.नं. ३८/२/२ चे जमीनीचे ७/१२ वर नाव लावणे बाबत | अपीलकर्ता गैरहजर अपीलकर्त्याची मागणी कार्यवाहीशी संबंधित असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | १२६० / पुणे | श्रीमती डेजी जोओ बोथेल्लो, रा.प्लॉट नं. २०३, गंगा सवेरा, वानवडी, पुणे-४२ | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पुणे | अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे | मौजे नाना पेठ येथील सि.स.नं.९७४ वरील अपार्टमेंट १, क्षेत्र १११.५० चौ. मी. या मिळकतीवर खरेदी प्रमाणे नावे नोंद होण्यासाठी दि. ११.६.२००७ रोजीच्या अर्जावर घेण्यात आलेल्या निर्णयाची प्रत | अपीलकर्ता गैरहजर अपीलकर्त्याला माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. या अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्यांच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. तक्रार राहिली नसताना अपील करणे व अन्य व्यक्तीने अपीलकर्त्यांचे नावे सही करणे या गंभीर गैरप्रकाराबाबत वरील सर्व अपीलकर्त्यांनी आपला खुलासा दि. १५.१०.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. त्यानंतर त्यांच्यावरील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय घेण्यात येईल.

**पुणे**
**दि. २३.९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५१ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अशोक सुरेश मोरे<br>मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरुर<br>ता. शिरुर, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर<br>ता. शिरुर, जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. अशोक सुरेश मोरे यांनी जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरुर यांच्याकडे दि. २८.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये गावोगावच्या बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांची व तालुक्यातील पंचायत समितीच्या विविध विभागातील कर्मचारी, सर्व ग्रामसेवक यांची यादी व ते नागरिकांना कधी भेटणार यासंबंधी माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास दि. १.१२.२००७ रोजी टपालाने व दि. १२.१२.२००७ रोजी समक्ष माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याने पोच दिल्याची प्रत त्यांनी सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. माहिती तीस दिवसांच्या मुदतीत देण्याची समज जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरुर यांना देण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २३.९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १७.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७१ +११७२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | सौ.कृष्णा घनशामदास मोटवाणी<br>लाल मंदिरा समोर, रिव्हर रोड,<br>सुभाष नगर, पिंपरी,पुणे-१७ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, पुणे शहर (३), पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, पुणे | हजर |

अपीलकर्त्या सौ.कृष्णा घनशामदास मोटवाणी, लाल मंदिरा समोर, रिव्हर रोड, सुभाष नगर, पिंपरी,पुणे-१७ यांनी जन माहिती अधिकारी उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३), पुणे यांचेकडे दि पिंपरी आर इंडस्ट्रियल को.ऑप.संस्थेच्या दि.२८ मे १९४८ पासूनच्या अभिलेखाच्या सत्य प्रती मिळाव्यात म्हणून दि.३१.१०.२००६ व २१.११.२००६ रोजीचे अर्जान्वये मागणी केली होती.

संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने अर्ज निकाली काढण्यात येत आहे. हवी असलेली माहिती संस्थेशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०७.२००७ रोजी सौ.मोटवाणी यांना कळविले.

सौ.मोटवाणी यांचे अपील अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी अंशतः मान्य केले. सौ.मोटवाणी यांनी नव्याने संस्थेकडे अर्ज करावा, असे त्यांनी आदेशित केले. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो की नाही, याबद्दल दुमत होते. हा कायदा लागू

असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. दुसऱ्या अर्जावरील अपील अंशतः मान्य, करुन अपीलकर्त्यास ७ दिवासांच्या आत माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला.

अपीलकर्त्या गैरहजर होत्या. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांनी दि.२८.०६.२००७ रोजीच्या रोजनाम्याची छायांकित प्रत सादर केली. ती पाहाता अपीलकर्त्यास जागेच्या कागदपत्राच्या छायांकित प्रती देण्यात आल्या आहेत. तशी अपीलकर्त्याची स्वाक्षरी आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) वरील अपिले निकाली ठेवण्यात येत आहेत.

२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेली माहिती ३० दिवसात दिली गेली पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २५-०९-२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११८० / पुणे | श्री. नामदेव शामराव नालंदे, संपादक, सा. कऱ्हा-भिमा टाईम्स् , शिंदे बिल्डिंग, व्हिल कॉलनी, बारामती जि. पुणे | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे | दि. ३०.४.२००७ ते ११.६.२००७ कालावधीतील शिक्षक, शिक्षण सेवक, उप शिक्षकांच्या बदल्यां संदर्भात पाच मुद्दयांची माहिती | माहिती दिली. परंतु ती अपूर्ण असल्याचे अपीलकर्त्याने स्पष्ट केले. सदर माहिती १० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले, त्यास अपीलकर्त्याने मान्यता दिली. |
| २ | १२८९ / पुणे | श्री. हरून सुलतान सय्यद मु.पो.माळेगाव बु. ता.बारामती, जि. पुणे | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत माळेगाव बु. ता. बारामती, जि. पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत ), पंचायत समिती, बारामती, ता. बारामती, जि. पुणे | ग्रामपंचायत माळेगाव बु. यांच्या सर्व व्यावसायिक गाळ्यांसंदर्भात, भाडेकरारांसंबंधी व त्यांच्या वितरणा संबंधी माहिती | जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली. ती परत आली आहे. दि. १७.७.२००८ रोजी समक्ष माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली. अपीलकर्त्यांनी तशी पोच दिली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०६८ + १०६८-अ / पुणे | श्री. शशिकांत दत्तात्रय खैरे मु. खंडु खैरेवाडी पो.भोंडवेवाडी, ता. बारामती, जि. पुणे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद पुणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे | यशवंत ग्राम समृध्दी योजनेतील सभामंडपाचे कामाचा तपासणी अहवाल व रस्त्याच्या नित्कृष्ट कामा बाबतचा तपासणी अहवाल इ. माहिती | अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. अपील निकाली ठेवण्याबाबत विनंती केली आहे. |
| ४ | १३०१ / पुणे | श्रीमती प्रभावती भिकाजीराव कोरे रा. पौड कॉम्प्लेक्स, सु.प्रभा निवास, पौड, ता. मुळशी, जि. पुणे | ग्रामसेवक पौड, ता. मुळशी, जि. पुणे | विस्तार अधिकारी ( पंचायत ) पंचायत समिती, मुळशी (पौड) ता. मुळशी, जि.पुणे | दि. २८/१, दि. २९/१ अन्वये मे. ज्वेल असोसिएट्स (पौड कॉम्प्लेक्स) तर्फे एकमेव प्रोपा.इस्माईल इब्राहीम मुजावर यांना घरबांधणी व्यावसायिक इमारत या करिता दिलेल्या परवानगी बाबत बांधकाम पूर्ण झालेबाबत दिलेल्या प्रमाण पत्राची प्रत | अपीलकर्ता गैरहजर मागणी प्रमाणे ग्राम पंचायतीने प्रमाणपत्र दिले नसल्याने देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.८.२००८ रोजीचे निवेदन. जन माहिती अधिकारी यांचा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कायम केला आहे व त्यांचा दि. १६.७.२००८ चा निर्णय सर्वानुमते मान्य |
| ५ | १०६० / पुणे | श्री. कांताराम तात्याबा काळे मु. पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि. पुणे | ग्रामसेवक काळेवाडी-दरेकरवाडी ग्रामपंचायत घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, ता. आंबेगाव जि.पुणे | दि. १.७.१९९८ रोजी दिलेल्या पत्रावरून घोडेगाव ग्राम पंचायतीने कालेवाडी, दरेकरवाडी हद्दीत पाणी पुरवठा करण्याची वसुल देख -भाल करण्यासाठी ताब्यात दिलेली आहे. पाणीपट्टी वसुलीच्या अधिकारासाठी ग्राम-सभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचेकडून घेतलेल्या परवानगीच्या प्रती | अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागणी केलेली माहिती विहित मुदतीत देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

३. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले, असे ज्या अपिलांमध्ये नमूद केले आहे त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पंधरा दिवसांत आयोगास सादर करावा. यानुसार पूर्तता अहवाल न आल्यास संबंधित अधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि. २९ .९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १६.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १२०९ / पुणे | श्री. नितीन यशवंत देशपांडे रा.३, गौरी शंकर, ५०-अ, पेस्तम सागर, रस्ता नं.२, चेंबूर, मुंबई-८९ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय महसूल शाखा पुणे-१ | अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय महसूल शाखा पुणे-१ | पौड तालुक्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराबाबत दि.३.४.२००७ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांना दिलेल्या तक्रारीबाबत | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर होते. मात्र आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत निवेदनात नमूद केले आहे. |
| १२७१ / पुणे | श्री. प्रभाकर अबुजम पिल्ले रा. ६३/६, केदारी नगर, राधेशाम सोसायटीच्या शेजारी, वानवडी, पुणे-४११ ०४० | अप्पर पोलीस महासंचालक व संचालक बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे-८ | -- | सन २००६ या वर्षातील यंत्र चालकाच्या प्रमुख यंत्रचालक या पदावर देण्यात येणाऱ्या पदोन्नतीच्या अनुषंगाने एकूण तीन मुद्दयांची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील केल्याचे आढळून येत नाही. माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन |
| १२६७ / पुणे | श्री. नितीन संभाजी कदम मु.पो.दौंडज, ता.पुरंदर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, पुरंदर, ता. पुरंदर, जि.पुणे | तहसीलदार, पुरंदर, ता. पुरंदर, जि.पुणे | कामगार तलाठी, दौंडज, ता. पुरंदर यांनी रेशनकार्डला पावती लावताना ध्वजनिधीच्या नावा खाली केलेल्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी करावी. | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्याची प्रशासकीय कार्यवाहीची मागणी आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ११९७ / पुणे | श्री. गजानन शंकर इंगळे रा. रोकडिया हनुमानगनर, शेगाव, जि. बुलढाणा | जन माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाण पत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे-१ | अपिलीय अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाण पत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे-१ | श्री. मधुकर पिचड व डॉ.गोविंद गारे यांच्या अनुसूचित जमाती या वर्ग - वारीतील प्रमाण पत्राच्या वैधतेच्या वेळी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्याने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे. यामध्ये डॉ.गारे यांच्या मुलाने वडिलांची कागदपत्रे देण्यास असमर्थता दर्शविली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. अपील क्र. ११९७ मध्ये माहिती त्रयस्थ पक्षाची असली, तरी व्यक्ती सार्वजनिक क्षेत्रातील आहेत. विषयाची व्याप्ती अशी असल्यामुळे अपील-कर्त्याला संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून द्यावी. |
| ५ | ११७३ / पुणे | श्री. विनायक रंगनाथ गोसावी रा. अमि-बी.७, विलोज को.ऑप. हौ. सो. लि., पाईपलाईन रोड, बाळकुम-८, जि. ठाणे | निवासी नायब तहसीलदार, इंदापूर, ता. इंदापूर, जि.पुणे | तहसीलदार, इंदापूर, ता. इंदापूर, जि.पुणे | शाहू महाराज सरकारने १७५२ साली दिलेल्या सनद इमान व समाधी स्मारक इतिहास जो असेल ती सर्व कागदपत्रे | अपीलकर्त्याने मागितलेली कागदपत्रे ही खाजगी व्यक्तीच्या (श्री. मुरलीधर कृ. गोसावी ) ताब्यात आहेत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १९.९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १६.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२१२ / पुणे | श्रीमती अरूणा अरविंद घंटा द्वारा श्री. श्रीराम जल्लपेल्ली, रा.क्षीरसागरवाडा ८३०, भवानी-माता मंदिरा मागे, पुणे-४११०४२ | निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ, जि. पुणे | तहसीलदार वडगाव मावळ, जि. पुणे | मौजे नानोली तर्फे चाकण, ता. वडगाव मावळ येथील सर्व्हे नंबर ४६, गट नं.१०६ मधील प्लॉट नं.६ क्षेत्र ४ एकर वर श्री. अरविंद घंटा यांचे नाव लावणे बाबत | अपीलकर्त्या गैरहजर. अपीलकर्त्याची मागणी ही कार्यवाही करण्या बाबत असून या बाबीचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत येत नाही. |
| २ | ~~११२७~~ १२२७ / पुणे | श्री. सुरेश रामचंद्र भोंडवे, रा. साडेसतरा नळी, हडपसर, पुणे-२८ | निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. पुणेशहर जि. पुणे | तहसीलदार हवेली, ता. पुणेशहर जि. पुणे | मौजे रावेत, ता. हवेली जि.पुणे येथील स.नं. २०६/१/३ या वडिलोपार्जित शेत-जमिनीच्या वारसा हक्काची नोंद करणे बाबत | आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्या बाबत अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ११०० / पुणे | श्री. चंद्रकांत बाबुराव ढवळे मु.पुनावळे, पो.चिंचवड, ता. मुळशी, जि. पुणे | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, पौड, ता. मुळशी, जि. पुणे | अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे | मौजे पुनावळे ता. मुळशी येथील सर्व्हे नं.५०/४ ची साधी मोजणी करून ७/१२ रेकॉर्ड दुरूस्तीसाठी केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत, मोजणी नंतर सहकब्जेदारांच्या सह्या असलेल्या गुणाकार बुकाची झेरॉक्स व या सर्व्हे नंबरच्या फाळणी नकाशाची झेरॉक्स प्रत | अपीलकर्त्याने पुढे अपील चालविण्याचे नसल्याचे निवेदनात नमूद केले आहे. |
| ४ | १२१० / पुणे | श्री. निवृत्ती तुकाराम कांबळे श्री. सुदाम बापूराव गावडे रा. मु. मेडद, ता. बारामती, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार बारामती, ता. बारामती जि. पुणे | तहसीलदार बारामती, ता. बारामती जि. पुणे | मौजे मेडद, ता. बारामती येथील अतिक्रमणाबाबत दि.२३.४.२००७ रोजी केलेल्या आमरण उपोषणाच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई झालेली नसल्याने याबद्दल कायदेशीर दाद मागण्यासाठी माहिती मिळणेबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने आहे. या बाबीचा समावेश माहितीचा अधिकार अधि नियम २००५ मध्ये समावेश होत नाही. |
| ५ | ११२१ / पुणे | श्री. अशोक आबाजी हरगुडे मु.पो.सणसवाडी, (कवठेमळा) ता. शिरूर, जि. पुणे | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिरूर, जि. पुणे | अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे | माहे एप्रिल २००६ ते मार्च २००७ या कालावधीत मोजणी साठी पैसे भरलेल्या शेतकऱ्याची तारखे प्रमाणे यादी, मोजणी करून नकाशे दिलेल्या शेतकऱ्यांची यादी व विविध प्रकारच्या कामाच्या नकला | अपीलकर्ता गैरहजर. अर्जदाराने माहिती साठीचे शुल्क भरल्यास माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १२३७ / पुणे | श्री. निलेश भवरलाल शहा, फ्लॅट नं.२, सिटी सर्व्हे नं.२२६२, शिवसागार को.ऑप.हौसिंग सोसायटी, सी बिल्डिंग, मोदीबाग, शिवाजीनगर, पुणे-१६ | निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, जि. पुणे | जमिनीच्या इतर हक्कात लीज पेंडन्सीच्या नोंदणी करणेबाबत असलेले अर्ज व त्यांच्यावर झालेली कार्यवाही | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने आहे. या बाबीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये समावेश होत नाही. मात्र लीज पेंडन्सीबाबत विशिष्ट प्रकरणातील कार्य-वाहीची 'माहिती' हवी असल्यास देणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** २४.९.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र — पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १७.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.संतोष मधुकर भोसले,<br>मु.रेडा,पो.रेडणी,ता.इंदापूर, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अभियंता,सार्वजनिक<br>बांधकाम विद्युत विभाग,पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधिक्षक अभियंता,सार्वजनिक<br>बांधकाम विद्युत विभाग पुणे प्रादेशिक<br>मंडळ,पुणे-३ | हजर |

अपीलकर्ता श्री.संतोष मधुकर भोसले, मु.रेडा,पो.रेडणी,ता.इंदापूर, जि.पुणे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग,पुणे-१ यांचेकडे सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग मार्फत केलेल्या कामाची नावे व संबंधित अधिकारी व त्या अनुषंगाने माहिती मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग,पुणे-१ यांनी अपीलकर्त्यास माहितीसाठी अंदाजे रु.३०००/- शुल्क भरण्यास त्याच दिवशी कळविले. अपीलकर्त्याने शुल्क न भरता अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, पुणे प्रादेशिक मंडळ,पुणे-३ यांचेकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी या कामी सुनावणी न घेता दि.१४.०८.२००७ रोजीचे पत्रान्वये अपीलकर्त्यास रु.३०००/- भरण्यास कळविले. अपीलकर्ता माहितीच्या शुल्काची रक्कम भरत नाहीत, असे जन माहिती अधिकारी व

अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' नमूद केले आहे, तर अपीलकर्त्यांनी सुनावणीची मागणी केली आहे.

वरील बाबी विचारात घेता माहिती उपलब्ध असताना अपीलकर्त्यांने शुल्क भरुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी केलेला खुलासा मान्य करणेत येऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे. :

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २४-०९-२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

वाचा :- अपील / पुणे / १०१५ / २००७ दि. १०.९.२००८

वरील पत्रासोबतचे आयोगाचे दि. १०.९.२००८ रोजीचे आदेशामध्ये खालीलप्रमाणे बदल / सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२७७ / पुणे | मेजर जन. एस.सी.एन. जठार, (निवृत्त) अे-१०२, नीलसदन, १४२६ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३७ | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ | नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ | मेजर जन. जठार (निवृत्त) यांचे दि. ३.८.२००६ चे पत्रावर करण्यात आलेली कार्यवाही व तद्अनुषंगिक माहिती | दि. ८.७.२००८ च्या लेखी पत्राद्वारे. आयोगास अपील निकाली ठेवण्याबाबत कळविले आहे. |

अपीलकर्त्याची लेखी विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५ .९.२००८**

(स्वाक्षरी)
**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

OrderSept08

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. विनायक किसन वराडे<br>ओ-ए.१/००१, अजमेरा कॉलनी, पिंपरी, पुणे-१८ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, पशुसंवर्धन विभाग,<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा पशसंवर्धन विभाग,<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता डॉ. विनायक किसन वराडे यांनी जन माहिती अधिकारी पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे दि. १२.१.२००७ रोजीचे अर्जान्वये सेवापुस्तक वेतनवाढ तत्संबंधित कार्यालयीन टिपणी व पत्रव्यवहाराची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्याने दि.२२.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सदर अपिलाचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त समावेश करणेत आला होता. तथापि अपीलकर्ता उपस्थित नव्हते. मात्र अपीलकर्त्याच्या कामात कार्यवाही पुर्ण करून सर्व माहिती देण्यात आलेली आहे

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २९ .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे - नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२९५ / पुणे | श्री. विजय शिवाजी भगत द्वारा डॉ. प्रविण सप्तर्षि एम-१२/४१५, लक्ष्मीनगर, पुणे-८ | जन माहिती अधिकारी मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि. पुणे | अपिलीय प्राधिकारी मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि. पुणे | व्याख्याता पदावरील नेमणुक व वेतनसंबंधी | अपीलकर्त्यास माहिती एक महिन्यात उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात नमूद केले. अपीलकर्त्याने ते मान्य केले. |
| २ | १२७८ / पुणे | श्री. बाळासाहेब मानसिंग गरूड अभिनव नगर, जुनी सांगवी, विठ्ठल मंदिरा - जवळ, पुणे-२७ | जन माहिती अधिकारी पुणे विद्यापीठ, पुणे | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे | सर्वश्री. पेडामकर चाफेकर, बांबळे व राठोड यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने माहिती | चर्चेअंती कागदपत्रांचे निरीक्षण करून आवश्यक ती कागदपत्रे देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. |
| ३ | १०५५ + १०५५अ / पुणे | सौ.अनघा अनिल कुलकर्णी सेक्टर नं.२४, प्लॉट नं. ३३०, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ | सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | सांगली जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहु उद्देशीय विकास बँक मर्या., सांगली च्या २ टक्के व्याज माफी सवलतीच्या अनुषंगाने एकूण ८ मुद्दयांची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १२९० + १२९१ / पुणे | श्री. भजनलाल यशवंतराव निमगावकर सर्व्हे नं.७२१/१अ शोनान सोसायटी, नवी पेठ, पुणे-३० | स्वीय सहाय्यक, अप्पर विक्रीकर आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे विक्रीकर भवन, ४ था मजला, येरवडा, पुणे-६ | अप्पर विक्रीकर आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे विक्रीकर भवन, ४ था मजला, येरवडा, पुणे-६ | गोपनीय अहवालातील शेरे बदलून मिळण्याबाबत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तपशीलवार माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले, असे ज्या अपिलांमध्ये नमूद केले आहे त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २५.९.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता अहवाल न आल्यास संबंधित अधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. १६.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ